# फळसेवाडी हितकारी संस्था
## वार्षिक सर्वसाधारण सभा

**दिनांक** : रविवार 05 मार्च 2006
**स्थळ** : शिरोडकर हायस्कुल, परेल

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री मंगेश मनोहर राणे | 12. श्री भरत गणपत राणे |
| 2. श्री हेमंतकुमार रमेश राणे | 13. श्री मनोहर भिकाजी राणे |
| 3. श्री प्रविण प्रताप राणे | 14. श्री मधुसुदन श्रीधर राणे |
| 4. श्री रंजन रावजी म्हसकर | 15. श्री दत्ताराम विष्णू साटम |
| 5. श्री सुरेश रघुनाथ राणे | 16. श्री उदय भगवान राणे |
| 6. श्री अविनाश कृष्णाजी राणे | 17. श्री गुरुनाथ धोंडू राणे |
| 7. श्री अशोक दत्ताराम राणे | 18. श्री सुनिल सदानंद राणे |
| 8. श्री कांता रामचंद्र राणे (फळसेवाडी-वरवडे) | 19. श्री प्रविण मनोहर राणे |
| 9. श्री जयवंत नाना राणे | 20. श्री लवू शिवाजी राणे |
| 10. श्री शंकर बाळकृष्ण राणे | 21. श्री लक्ष्मण शिवाजी राणे |
| 11. श्री पांडूरंग सावजी राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्था यांची कार्यक्रम पार पाडल्यानंतर या कार्यक्रमाचा आढावा, हिशेब आदी संबधात एक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेस एकूण 21 सभासद उपस्थित होते.

सभेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे सभास्थानी स्थानापन्न झाल्यानंतर उपस्थितांचे स्वागत केले तसेच चिटणीसांनी सर्वांचे स्वागत करून अध्यक्षांच्या परवानगीने खालील विषयांवर चर्चा केली.

कौटूंबिक स्नेह संम्मेलन व मा महसूलमंत्री श्री नारायणराव राणे यांच्या सत्कारासंबधी सर्वाची मते जाणून घेतली. सर्व सभासदांनी हा सत्कार समारंभ अत्यंत देखण्या पध्दतीने व कोणताही गोंधळ न होता पार पाडला याबद्दल कार्यकारीणी व सक्रिय सभासदांचे कौतूक केले. अध्यक्षांनी गावी गेले असतांना काही व्यक्तींनी कार्यक्रम पत्रिका श्री अभयनाथ भगवान साटम यांचे नावे गावी पाठविल्याबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करून निवेदन दिले. तरी सभाग्रहाने अश्या छोट्या गोष्टींकडे ध्यान न देता पुढील कार्यक्रमाची आखणी करावी असे सुचविले.

यानंतर चिटणीसांनी या कार्यक्रमास झालेला खर्च यासंबधी आपणांस जमाखर्च पत्रक दिलेले आहे असे सांगून यावर चर्चा करण्यास सांगितले. काही ठरविक स्पष्टीकरणांनंतर शिलकी रक्कमेचा जमाखर्च मंजूर करण्यात आला. एकूण जमा रु.71,986/- (वर्गणी + देणगी) व खर्च रु.69,230/- आणि बाकी रु.2,756/- असा ताळा देण्यात आला.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-01-(16 to 20)

खर्चास मंजूरी सूचक श्री दत्ताराम विष्णू साटम
अनुमोदक श्री मधुसूदन श्रीधर राणे

यानंतर वाडीतील रस्ता, पाणी या विषयांवर व या विषयांवरील मा. नारायणराव राणेसाहेब यांना दिलेले पत्र वाचून दाखविण्यात आले.

यानंतर श्री रंजन रावजी म्हसकर यांनी फळसेवाडी शाळा ते वाडीस जोडणारा हा रस्त्याचा काही भाग डांबरीकरण करण्यासाठी बाकी आहे तरी पुन्हा एकदा या विषयावर पत्रव्यवहार करावा असे सुचविले.

यानंतर फळसेवाडी-पिसेकामते ते वरवडे-फळसेवाडी मा. नारायणराव राणे यांचे घर ही पाऊलवाट, पक्का रस्ता तयार करणे याबाबत चर्चा झाली. चर्चेनंतर वरवडेमधील बांधवांचे या रोडबद्दल मत जाणून घेउन नंतर पत्रव्यवहार करावा.

फळसेवाडी अंर्तगत रस्ता पाऊलवाटा दुरुस्ती या विषयांवर चिटणीसांनी आवाट व टेंबवाडी जोडणारा रस्ता असावा असे सुचविले. (1) जूना गाडीतळ ते जमादार यांचे घर (2) दिनकर राणे (पाठीमागील दार) (3) भगवान बा. सावंत (पाठीमागील दार) (4) विठोबा साटम यांचे घर (5) हेमंतकुमार राणे यांचे घर (6) पांडूरंग राणे यांचे घर (7) शंकर बाळकृष्ण राणे (जुना शेगुल). परंतू यावर चर्चा झाली असता हेमंत राणे – विठोबा साटम येथील भागाची मोजणी करावी लागेल तसेच श्री दत्ताराम विष्णू साटम यांनी या रस्त्यावर येणारया दोन फणसांमुळे हा रस्ता तयार करणेबाबत नाराजी व्यक्त केली, त्यावर बरीच चर्चा केली व रस्ता अश्याप्रकारे असावा असे ठरले.

(1) गाडीतळ (2) जमादार – नाना जमादार राणे यांचे घर (3) दिनकर राणे यांचा वाडा (4) बाळा राणे यांचा मांगर (5) दत्ताराम साटम यांचे घरापर्यंत तसेच (6) मारुती राणे यांचे घरासमोरील चाफा (7) दिनकर राणे यांचे घर अश्याप्रकारे असावा. अश्याप्रकारे पत्रव्यवहार करावा असे ठरले.

ब्राह्मण मंदिर लाईट व्यवस्था या प्रस्तावावर चर्चा करतांना श्री ब्राम्हणदेव येथपर्यंत लाईट नेण्यासाठी एक इलेक्ट्रीक पोल बसणार आहे. या सर्वांचा खर्च रु.1200/- ते रु.1500/- आहे. बाकी फिटिंगचा खर्च आहे. सध्यातरी गेले 5 ते 6 वर्षे संस्थेच्या सभासदांनी वर्गणी न दिल्यामुळे संस्थेकडे पैसे नाहीत. त्यामुळे फिटींग व पोलचा खर्च उचलला जाऊ शकत नाही, फक्त श्री रंजन रावजी म्हसकर यांनी लाईटबील खर्च देण्यास तयार आहोत असे सांगितले त्याबद्दल त्यांचे आभार मानन्यात आले.

तसेच शाळेच्या पुर्ण बांधणीबाबत चर्चा झाली. मा. श्री नारायणराव राणेसाहेब या ठिकाणी शाळा बांधू इच्छितात. परंतू शाळेच्या जमीनीच्या पेपर बद्दल काय ? याबद्दल सन 1937 ‘सर्वोदय ट्रस्ट’ ची स्थापना व इतर घडामोडीची माहीती दिली व ही जागा कुळ मुख्यतारव्दारे श्री नाना राणे (जमादार) यांना हक्क देऊन शाळा जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यासाठी संस्थेने दिनांक 21 सप्टेंबर 1997 रोजी पत्र दिले आहे असे सांगितले. तरी ही जागा क्लियर टायटल आहे त्यामुळे आपण यापुढे कोणताही उलट-सुलट पत्रव्यवहार करू नये असे सुचविले.

शेवटी वार्षिक वर्गणीबद्दल चर्चा झाली. श्री उदय भगवान राणे सह-खजिनदार यांनी संस्थेचया सर्व सभासदांना प्रत्येकाची वर्गणी किती बाकी आहे असे कळवावे जेणेकरून पैसे जमा होतील.
पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-01-(16 to 20)

शेवटी संस्थेच्या वतीने चहापाणी होऊन जेष्ठ सभासद श्री दत्ताराम विष्णू साटम, श्री मधूसुदन श्रीधर राणे, श्री अविनाश कृष्णाजी राणे हे सभेस उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभार मानन्यात आले. सभेस उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानून राष्ट्रगीत गाऊन सभा समाप्त झाली.

---